
।। श्री गुरुदेव ।।

“सर्व भूत हिते रत: ।”

# श्री संत शंकर बाबा

## जीवन दर्शन




: कवि–लेखक–गायक :

स्व. श्री. भि. शा. ऊर्फ श्यामकुमार खंडारे, मंगरुळ दस्तगीर, जि. अमरावती.

# श्री संत लहानुजी महाराज

## श्री क्षेत्र टाकरखेड



ॐ सोहं लहानुजी महाराज मंत्रोऽयं ।
कोटीदोषं विनाशयत् ।।

# श्री समर्थ सत्यदेव महाराज

## श्री क्षेत्र भारवाडी



ॐ सोहं सत्यदेवबाबा मंत्रोऽयं ।
कोटीदोषं विनाशयत् ।।

## अनुक्रमणिका...


| क्र. | गीत/लेख | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १) | द्वितीय आवृत्तीच्या निमित्ताने... | भास्कर मोहोड | |
| २) | भावपुष्प... | स्व. डॉ. ठोसर | |
| ३) | एक चिंतन | पुरुषोत्तम मारोडकर | |
| ४) | विश्वात्मक दृष्टी | | |
| ५) | गुरुब्रह्मा-गुरुर्विष्णू | | ०१ |
| ६) | वंदन | | ०२ |
| ७) | गोजिरे सगुण | | ०३ |
| ८) | गुरुकृपा | | ०४ |
| ९) | श्री लहानु महिमा | | ०६ |
| १०) | श्री लहानुमंत्र | | ०७ |
| ११) | सख्या शिवभोळा | | ०९ |
| १२) | माझे संत शंकर बाबा | | १० |
| १३) | सुंदर खोली परिसर पावन | | ११ |
| १४) | सर्व लेकरे एका प्रभूची | | १२ |
| १५) | संत शंकर दर्शने | | १२ |
| १६) | संत लहानुजी बाबा | | १४ |
| १७) | सर्वलेकंरे प्रभूची | | १५ |
| १८) | धावत येई संत शंकरा | | १६ |
| १९) | मानवता जागवा | | १७ |
| २०) | मुक्तीचा आनंद | | १८ |
| २१) | लहांनुजी सद्गुरुने | | १९ |
| २२) | श्री संत लहानुजी | | २० |
| २३) | वंदन करुया प्रिय संता | | २२ |
| २४) | व्दारी आलो, शंकरबाबा | | २३ |
| २५) | भाविक साधकांनो | | २४ |
| २६) | माझे माहेर पंढरी | | २५ |
| २७) | गायी गुरांच्या हंबरण्यातुनी | | २६ |
| २८) | धन्य-धन्य आमुचे शंकरबाबा | | २७ |
| २९) | श्री समर्थ लहानुजी महाराज आरती | | २८ |
| ३०) | श्री समर्थ सत्यदेवबाबा महाराज आरती | | २९ |
| ३१) | श्री समर्थ सद्गुरु शंकरबाबा महाराज आरती | | ३० |

## द्वितीय आवृत्तीच्या निमित्त्याने...

'श्री संत शंकर बाबा महाराज जीवनदर्शन' (गद्य-पद्यात्मक) हे छोटेखानी पुस्तक श्री भि. शा. उपाख्य शामकुमार खंडारे यांनी लिहून आणि त्याचे प्रकाशन होऊन आज तब्बल एक तपाचा काळ लोटला आहे. ह्या पुस्तकाने आश्रम आणि आश्रमाच्या परिसरातील भक्तांच्या मनात श्री संत शंकर बाबांच्या जीवनातील अनेक घटनांचा कीर्ती सुगंध पसरविला आहे. गद्य माहिती सोबतच पद्यात्मक गीतांमुळे हे पुस्तक अल्पावधीतच भक्तांच्या आवडीचे झाले होते.

ह्या पुस्तकाची प्रथम आवृत्ती २००४ च्या श्री रामनवमी महोत्सवात प्रकाशित झाली होती. श्री संत शंकर बाबा महाराजांच्या भक्तांनी व सुज्ञ वाचकांनी ह्या पुस्तकाचे आनंदाने स्वागत केले. काळाच्या ओघात ह्या पुस्तकाच्या सर्व प्रती समाप्त झाल्या. त्यामुळे श्री संत शंकर बाबा महाराजांच्या भक्तांची व जिज्ञासू वाचकांची ह्या पुस्तकाला आग्रहाची मागणी येवू लागली होती. त्यामुळे ग्रंथ प्रकाशन समितीने ही द्वितीय आवृत्ती २०१६ च्या हरतालीकेच्या दिवशी आणि श्री संत शंकर बाबा महाराजांच्या ७२ व्या प्रगट दिनाच्या शुभ मुहूर्तावर अर्थात ४ सप्टेंबर,२०१६ ला प्रकाशित करण्याची परवानगी 'श्रीं' कडून मिळविली आहे. ही द्वितीय आवृत्ती जिज्ञासू वाचक व भक्तजनांच्या हाती सुधारीत स्वरूपात देतांना मला आनंद होत आहे.

ह्या आनंदाचे प्रसंगी आमचे स्नेही व ह्या पुस्तकाचे लेखक, कवी, गायक आज आमच्या सोबत नाहीत ह्याचे मनस्वी दु:ख होत आहे. नियती पुढे कोणाचे काहीही चालत नाही हे अंतीम सत्य आहे!

ह्या आवृत्तीचे वैशिष्ट्य असे की यात अनुक्रमणिका दिलेली आहे. त्यामुळे कोणत्या पृष्ठावर कोणता प्रसंग आला आहे आणि त्या अनुषंगाने कोणते गीत आलेले आहे, हे अनुक्रमणिकेत पृष्ठ क्रमांकासह दिलेले आहे. त्यामुळे भक्तांना व जिज्ञासू वाचकांना अनुक्रमणिकेवरून नेमका प्रसंग सहजपणे शोधता येईल.

ग्रंथ प्रकाशन समिती, श्री संत शंकर महाराज आश्रम, प्रकाशित करीत असलेल्या द्वितीय आवृत्तीचे सर्व भक्तगण स्वागत करतील ही आशा नव्हे, अपेक्षा आहे.

ग्रंथ प्रकाशन समिती,
श्री संत शंकर महाराज आश्रम
श्री क्षेत्र पिंपळखुटा, ता. धामणगाव जि. अमरावती.

सर्वांचा स्नेहांकित
भास्कर मोहोड

# भावपुष्प...

सद्‌गुरु शंकर महाराजांवर श्री खंडारे यांनी केलेले प्रवचन व त्यांच्या चरित्राचे गायन अतिशय मोलाचं आहे. ते ऐकण्याचा माझा पहिलाच प्रसंग आहे, पण ते ऐकत असताना संत शंकर महाराजांच्या व्यक्तित्त्वाचं, कर्तृत्वाच, त्यागाचं आणि तपश्चर्येचं चित्रण फार सुंदर असं त्यानी केलं. परमेश्वराची कृपा सर्वांना भिन्न भिन्न स्वरुपाची मिळते. म्हणून वं. राष्ट्रसंत म्हणतात ''कुठे हे दे। कुठे ते दे।। न देसी सर्व कुणाला प्रभू। हा खेळ दुनियेचा। कशाला सांग केलासी'' कोणाला कोणती कला परमेश्वर देतो आहे आणि कोणाच्या जीवनात महत्त्वाचे कार्य, पुण्यमय कार्य करुन घेतो आहे याचा नेम नाही.

''भाग्य कोणाला लाभे ऐसे'' असे म्हणतात. हे भाग्य आमचे खंडारे गुरुजींना लाभलं! संत शंकर बाबाचे चरित्र समाजापुढे मोठ्या भक्ती भावनेने ठेवण्याचं कार्य त्यांच्या हातून होत आहे. सेवेचे, संत कार्याचे, समाज कार्याचे व्रत त्याच्या जीवनात पदरी पडलं. ''पुण्य पाहिजे बहुत। जन्मातरीचे संचित''।। आणि म्हणून फार मोठं मोलाचं कार्य त्यांनी उचललं आणि त्यातुन समाजामध्ये फार मोठी जागृती होईल, यात शंका नाही.

सद्‌गुरु शंकर बाबांच्या कर्तृत्वाचा, तपश्चर्येचा आणि व्यक्तित्त्वाचा हा करुण रसाचा महाप्रसाद समाजापुढे ठेवला. पायातील दगडाला जो पर्यंत समाज किंमत देत नाही, तो पर्यंत त्याचे मोल कळत नाही. पायातील दगडाची किंमत फार मोठी मोलाची आहे ह्याची जाणीव निर्माण होणं याचाच अर्थ ज्ञान आहे. सद्‌गुरु लहानुमहाराजांचे दर्शनास लक्षावधी लोक गेलीत पण नेमके ते संत शंकर बाबा जवळच का प्राप्त व्हावे! म्हणजे संत लहानुबाबाजवळ कुठे भेदभाव होता का? असं तर नाही ना! आणि

मग हजारो लोक ज्या संताच्या दर्शनाला गेलेत त्या संत ल्हानुमहाराजांजवळ तेथे काही फार मोठी गोडी गुलाबी होती असाही भाग नाही. प्रसंग आला तर काठीने, कधी शब्दाने दाटावयाचे, तेथे असा कणखर बाणा होता. भिंतीकडेच पाहून, भिंतीशीच बसून साऱ्या विश्वाच चित्र रंगविणारा हा एक महान योगी होता. अशा या योग्याचा, तयाचे बिसाट शब्द। सुखे म्हणो येती वेद।। असं एक महान सामर्थ्य त्यांच्या वाणीत होतं. ते सामर्थ्य आकलन करण्याची प्रेरणा, ते हृदयात पचविण्याची ताकद, ते सामर्थ्य आपल्या अंत:करणाशी त्यागाने सिद्ध करण्याचा बाणा, हा संत शंकर बाबा जवळ आहे. हेच संत शंकर महाराजांच वैशिष्ट्य आहे. तेथे अनेक ज्ञानी गेले, अनेक पंडीत, साधुही गेलेत, परंतु ते भाग्य कुणाला लाभलं?

जे आज आपण पाहत आहोत, ज्यांच्या हजारो भक्तगणांचा मेळावा एका महापुरुषाच्या जवळ बसतो आहे, रमतो आहे आणि तेथून आशीर्वाद घेऊन, जीवनाच्या साऱ्या जबाबदाऱ्या उचलून घेत आहेत असे ते भाग्य आपणाला शंकर बाबाजवळ बघायला मिळतं. आपण जे ऐकतो आहे, हे जे वैशिष्ट्य आहे, ह्याचच नाव आहे हरिकृपा! लोक समाजात एखाद्या संतानं आकडा दिला, एखाद्या संतानं बिल्डींग बांधुन दिली, एखाद्या संतानं मुलीच लग्न करुन दिलं, तर त्याचेवर त्या संताची फार मोठी कृपा आहे असं समजतात. मला अस वाटतं, एवढं संताना रिकामपण नसावं की एवढाच धंदा त्यांचेकडे असेल? पण ते कां घडतं. स्वाती नक्षत्राचं पाणी आणि शिंपल्याचं तोंड उघडणे ह्या दोन संधी बरोबर साधल्या तरच मोती तयार होतात. मग स्वाती नक्षत्राचं पाणी काही कमी पडत नाही. ते वर्षानुवर्षे पडत राहतं, परंतु त्या शिंपल्याची तोंड उघडण्याची जी क्रिया आहे. त्या क्रिये मध्ये, जो थेंब पडतो त्याचाच मोती तयार होतो. त्याप्रमाणे सद्‌गुरु लहानुजी महाराजांचा स्वाती नक्षत्राचा एक बुंद आमच्या शंकर

महाराजांच्या मुखात पडला.

आम्ही संतांच्या दरबारात जातो तर आम्ही आमच्या हृदयाचे दारं बंद ठेवतो. परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी पर्यंत ज्या चार वाणी आहेत, त्यामधल्या आमच्या वैखरी पर्यंतच आमचा विचार राहतो. वाणीने आम्ही बडबड करतो. आमच्या सुप्त वाणीला त्याचा कुठलाही स्पर्श होत नाही, तो स्पर्श संत शंकर बाबाच्या वाणीला झाला, म्हणून या वाणीत सामर्थ्य आलं. गारा तुडवित, पायी यात्रा करीत करीत शंकर बाबा संत लहानुजींच्या दर्शनास जात होते. ते पाहणारे भाग्यवंत आजही आमच्यात आहेत. परंतु ते जात असतांना त्या एका युग पुरुषाचा संदेश त्यांनी आपल्या अंत:करणात रुजविला आणि तो फलद्रुप केला. हे बाबाचं वैशिष्ट्य आहे, भाविकांनो!

मोठे लोक ज्या मार्गाने गेले तो मार्ग आठवावा लागतो आणि तो जर आठवला गेला नाही तर ते चरित्र-चरित्र राहत नाही. मला फार आनंद झाला. आमच्या खंडारे गुरुजींनी आणि आमच्या सौ. उमाताईने संत शंकर महाराजांचे चरित्र वर्णन केले. अनेक लोकांना हे भावदर्शन घडविलं असा हा अतिशय बोधप्रद कार्यक्रम आहे. या युग पुरुषांच्या आठवणी आपल्या हृदयामध्ये येणे ही भाग्याची गोष्ट आहे. ही श्री खंडारे गुरुजींनी केलेली काव्यरचना ऐकत असतांना अनेक भाविक मंडळी गहिवरली असेल. मला तर एक दोन वेळा सहजच ह्या संत पुरुषाच्या अनेक लिलाच दर्शन घडलं असं एक चिंतन मनाला स्पर्शुन गेलं. मी धन्यवाद देतो या मंडळींना ! जयगुरु !!

डॉ. ठोसर दादा

गुरुदेव सेवाश्रम, गुरुकूंज जि. अमरावती.

सचिव - मानवता प्रतिष्ठान दास टेकडी

# एक चिंतन...

व्यक्तिभेद, जाती भेद, पंथ भेद, वर्गभेद, वर्णभेद, धर्मभेद, कर्मभेद व घोर अकर्मण्यता यात रुतून बसलेल्या समाजाला संत लहानु कृपेने प्राप्त झालेल्या सहज वाणीने गदगदा हलवून सोडणाऱ्या तपश्चर्येच्या पुजाऱ्याची पिंपळखुटा ही कर्मभूमी आहे. संताच्या स्पर्शाने पावन झालेल्या ह्या भूमीतच अमुचे प्रिय संत शंकर बाबा वास्तव्य करुन आहेत.

हुंडा पध्दती, अंधश्रध्दा, अनिष्ट रुढी, कर्मठ आचार विचार, सोंग-ढोंग व बुवाबाजी यावर घणाघाती घाव घालीत आहेत, ते आमुचे शंकर बाबा !

आज राष्ट्रीय एकात्मतेची जी धून वाजविल्या जात आहे तिचे स्वर संत शंकर बाबाचे कानी पडले त्यांनी काळाची पावले ओळखली आहेत. ते अजात शत्रु आहेत. त्यांनी रणशिंग फुंकले आहे, क्रांतिकारी विचारांचे, व्यसन मुक्तीचे, स्त्री मुक्तीचे! दुःखीतांचे दुःख वेशीवर टांगले आहे. रंजल्या गांजल्यांना जवळ केले आहे व मानवाला आत्मनिर्भर करीत आहेत. भटकलेल्यांना मोक्षाचा मार्ग दाखवित आहेत. चमत्कारापासून अलिप्त राहून, स्वातंत्र्य, समता व बंधूप्रेम यांचा त्रिवेणी हृदय संगम म्हणजे आमुचे संत शंकर महाराज ! सढळ, सुबोध, सरस पण तितकंच समर्थ असं त्याचं जीवन आहे. त्यांच्या ओघवती वाणीने जेंव्हा शब्दब्रह्म ते साकारतात त्यावेळेस श्रोते तल्लिन होतात व त्यांची ब्रह्मानंदी टाळी लागते आणि शेवटी मनाच्या मोहळातून झिरपत राहते ती मधुराभक्ति!

शेवटी, काळाच्या कपाळावर कोरले आहे जीवनाचे तत्त्वज्ञान, ते संत व महंत यांच्या शिवाय कोण बरे सांगू शकेल?

वंदनिय श्री संत शंकर बाबांच्या 'जीवन दर्शनात' काही तृटी असतील ही, तरी तो भरुन आलेल्या आभाळाचा काळेपणा आहे. सॉक्रिटीसची कुरूपता आहे, फणसाचे काटे आहेत, लहान मोठे खडक आहेत! एकदा सद्विचारांची भरती सुरु झाली की, त्याचा मागमूसही सुद्धा राहत नाही !

जयगुरु!

आपला

पुरुषोत्तम रोडबाजी मारोडकर

राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक, म.रा.

मु. पो. आरमोरी, जि. गडचिरोली

## ४) विश्वात्मक दृष्टी

विश्वरूपाची विश्वात्मक दृष्टी।
माझ्या शंकर बाबांची।।
भेदाभेद कुणीही करो जरी।
शक्ती असे लहानु कृपेची।।धृ।।

सर्वांतरी सदा पाहती।
एकात्म रुप भावाशी।।
जो जो भेटे त्यासी हृदयी।
धरुनी बोध दे सर्वांशी।।
ऐसा परम दयाळू संत हा।
शंकर बाबा अमुचाची।।१।।

जगती जनार्दन व्यापलेला।
तत्त्व जगाशी सांगतसे।।
परंपरा ही ज्ञानेशाची।
लहानु वचना विसरु कसे।।
आडकुजीचा प्रसाद तुकड्या।
लहानु नि सत्यदेवासी।।२।।

सदा मग्न त्वा शंकर बाबा।
लहानुजीच्या राहतसे।
''माझे माझे म्हणू नको''
आजही गुरु मन सांगतसे।।
तैसा गुरुबोध भिमरावा दे।
ऐसी प्रार्थना एकचि।।३।।



# श्री संत शंकर बाबा जीवन दर्शन

गद्य – पद्यात्मक

## ५) गुरुब्रह्मा गुरुर्विष्णु

।। गुरुब्रह्मा गुरुर्विष्णु, गुरुर्देवो, महेश्वरा: ।। गुरुसाक्षातपरब्रह्म तस्मैश्रीगुरवेनम: ।। ब्रह्मानंदं,परम सुखदं, केवलं ज्ञान मूर्ति। व्दंव्दातीतं गगनसदृष्यं तत्त्वमस्यादिलक्षं ।। एकं नित्यं विमलमचलं सर्वाधिसाक्षीभूतं। भावातीतं, त्रिगुणरहितं, सद्गुरुं तन्नमामि''।। ध्यानमूलं गुरुर्मूर्ती, पूजामूलं गुरुपदं ।। मंत्र मुलं गुरुवाक्यं मोक्षमूलं गुरुकृपा ।।

माझ्या भाविक भक्तांनो । संत आणि भगवंत हे एकच होय ! परमेश्वरच संत रुपाने जगात अवतार घेतात. ''जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूती। देह झिजविती परोपकारे'' ।।

वर्धा तीरावर ठायी ठायी तीर्थ क्षेत्रे आहेत. ह्या सातपुड्याचे कन्येने विदर्भाचा परिसर पावन केलेला आहे.

त्या ह्याच वशिष्ठेच्या तीरातिराने श्रीराम प्रभु सालबर्डीहून चंद्रपूरला गेलेत. अशाच पावन झालेल्या वर्धा तीरावर अमरावती जिल्ह्यात पिंपळखुटा हे एक छोटेसे गाव आहे. ह्याच ठिकाणी श्री संत लहानुनाथाचे कृपा प्रसादाने श्री संत शंकर बाबा उदयास आले. त्यांच्यामुळेच पिंपळखुटा हे एक तीर्थ क्षेत्र बनले. ह्या संत लहानुजीच्या शिष्याची त्यांच्याच कृपेने पिंपळखुटा ही कर्मभूमी झाली. वास्तविक पाहतां अत्यंत गरीब अशा कोळी समाजात संत शंकर बाबाचा जन्म झाला. म्हणतात ना, नदिचे मुळ व संताचे कुळ पाहू नये ते! संतांचा अवतारच सर्व समाजाच्या कल्याणासाठी असतो. संत काही कोण्या जातीचा, कोणत्या धर्माचा किंवा देशाचा नसतो. त्यांची भूमिका विश्वात्मक असते, परंतु माणसाच्या कूपमंडूक विचार सरणीने संतांना व त्यांच्या भूमिकेला व कार्याला संकुचित केल्या जाते.

भाविकांनो ! उपेक्षित, दीन, दुबळे व दुःखितांना हृदयासी कवटाळणारा मानवतेचा महान पुजारी, श्री संत शंकर बाबा, आपणा सर्वांना मानवतेची कथा नि व्यथा सांगतो आहे, चैतन्याचा साक्षात्कार घडवितोआहे, सत्धर्म व अद्वैताची कथा सांगतो आहे. अशा सद्गुरु संत शंकर बाबाला आपण सर्वजन वंदन करु या !

## ६) वंदन

वंदन करु या सद्गुरुराया शंकर बाबाला ।।
लहानुजीच्या कृपा-प्रसादे। होई दर्शन सकला ।।धृ ।।

करुणेचा तू-अथांग सागर। दया-क्षमा-शांतीचे आगर ।।
भक्त जनांना नव दृष्टीने। सत्यमार्ग कथिला ।।१ ।।

शुभ्रवस्त्रा धारण करिती। धर्म मार्तंडा विवेक शिकविती।
शुद्ध सत्व अन् मानवतेचा। पुरस्कार केला ।।२ ।।

मानवतेचा मंत्र देवूनी। धर्म जातीचे बंधन तोडूनी।
कर्मयोग साधूनिया सगळ्या। भक्ता शिकविला ।।३ ।।

भाविक भक्ता बोध जाहला। अनुभवती ते अनुभूतिला ।।
सत्य तोचि देव खरा तो। पटले बाबाला ।।४ ।।

अशा चार संताचा जन्म पिंपळखुटा, जि. अमरावती येथे श्री बुधाजी नागपूरे यांचे गृही शुक्रवारी हरितालिकेचे दिवशी १९-८-१९४५ साली सौ. माय भागीरथाबाई हिच्या पोटी सद्गुरु शंकर बाबाचा जन्म झाला. श्री बुधाजी नागपूरे व सौ. माय भागीरथाबाई हे दोघेही शिवभक्त! उभयतांना खूपच काबाड कष्ट करावे लागत असे व अर्धपोटी तर कधी उपाशी राहून त्यांचा जीवनक्रम चालू असायचा. अत्यंत दुःखी व कष्टी असतांनाही त्यांनी भगवान शंकराची भक्ती कधी सोडली नाही. सतत नामस्मरण सुरु असायचे. क्षणभर सुद्धा त्यांना विश्रांती मिळेना. भक्तीने व श्रद्धेने भोळा सांब सदाशीव

प्रसन्न झाला. आणि त्या उभयतांना आशिर्वाद मिळाला. नऊमास भरताच एक तेजस्वी व गोजीरं अस बाळ सौ. माय भागीरथाबाई हिच्या पोटी जन्माला आलं. ''अजन्मा जन्माशी आला''! अस गोजिरं सगुण बाळ दिसामासाने वाढू लागलं. बालपणीच बाळाचे काही चमत्कार व साक्षात्कार त्यांचे आई वडिलांना झालेत. ५,६ वर्षाचा शंकरबाळ लहानपणीच आई-वडीलांना त्यांच्या कामात मदत करु लागला. त्यांच्या दु:खात व कष्टात सहभागी होत असायचा, शेत मालकाकडे नोकरी करायचे. त्यावेळेस त्यांच्या मालकानांही लहानशा शंकरचे काही चमत्कार दिसलेत, असा कर्मयोगी बालक कोण होता बरे? कसे होते त्यांचे रुप!

## ७) गोजिरे सगुण

(सगुण रुप दर्शन)

गोजिरे सगुण - शंकर बाळ।
पिंपळखुटा ग्रामी - वास करी।।धृ।।

उद्धराया दलिता - दु:खी कष्टी जना।
अवतारच हरिचा - भूवरी, भूवरी, भूवरी।।१।।

बालपणी दावियले - चमत्कार नाना।
कर्म योग करिता - शेतावरी, शेतावरी, शेतावरी।।२।।

भक्त-भाविकांना - दर्शन घडले।
लहानु कृपेने - श्रीहरि, श्रीहरि, श्रीहरि।।३।।

अशा शंकर नाव धारण केलेल्या १२, १३ वर्षाच्या मुलाला बाळपणीच ध्यान-धारणा करण्याची उपजतच आवड होती. त्याने शीव मंडळात शीवशंकराची पूजा व भक्ती सुरु केली. त्यानंतर त्यांना लळा लागला तो श्री संत लहानु बाबाचा, कारण गुरुकृपेशिवाय साधना पूर्ण होवू शकत नाही. शंकरबाबाला लहानपणी निद्रावस्थेत उपवास करण्याचा आदेश

मिळाला. तोच त्यांनी खरा मानून वयाचे १५ व्या वर्षापासून उपवास सुरु केलेत. आणि श्री समर्थ लहानुबाबाचे स्वप्नातील आदेशाचे यथायोग्य पालन केले. श्री संत लहानुनाथ हे कपील मुनीचे अवतार होय. स्वत: ते ही कधी-कधी म्हणायचे, ''अरे! मी कपिल्या होय बरं।''

संत लहानु दरबार तर भक्त गणांनी खचून भरलेला असे. पण त्यावेळीही सर्वात जास्त प्रिती संत लहानुजीची अमुचे शंकर बाबावरच असायची. शंकर बाबाचे मनाला गुरुदर्शनाची आत्यंतिक तळमळ लागायची. खरे म्हणजे सद्‌गुरु सुद्धा आपल्या खऱ्या शिष्यांचे शोधात असतातच. शंकर बाबाने परमहंस सद्‌गुरु लहानु-नाथाचे चरणी माथा टेकविला आणि त्यांचे दैन्य दु:ख दूर पळाले. दिव्य ज्ञानाचा प्रकाश पडला आणि त्याचं अंतरमन म्हणून लागलं! काय म्हणाले ते?...!

## ८) गुरुकृपा

संत लहानुजीचे चरणी-मस्तक ठेवितां ।।
षडविकार दूर पळाले। आशीर्वाद मिळतां ।।धृ ।।

तुझिया ओठी (बाबा) झरा अमृताचा।
तृप्त झालो मनी-आनंद श्रवणाचा।
अक्कल, साया! अक्कल साया! -बोल तुमचे ऐकता ।।१ ।।

कपील लहानु एकचि-लहानु बाबा सांगती।
रंजल्या नि गांजल्यांना - दिलासा ते देती।
मी ही धन्य झालो-अनुभूति येता ।।२ ।।

तळमळ माझे मनी - गुरु करण्याची।
पूर्ण झाली लहानु कृपेने - आशा जीवनाची।
लहानु कृपा दृष्टिने - मनी हर्ष होता ।।३ ।।

दिवसेंदिवस श्री शंकर बाबाचे मनाला श्री संत लहानुजी नाथाची खुपच

ओढ लागली. त्यांच्या नामस्मरणात व साधनेत ते गर्क राहू लागलेत.

एकदाचा प्रसंग -१९५८ साल उजाडले होते. शंकरबाबा लोकांची चाकरी करायचे. त्यांच्या मनांत पूर्ण वैराग्य निर्माण झालं. योगी लोक ज्याप्रमाणे काही न खातापिता राहतात तसेच मलाही करा लहानुनाथा! असे अत्यंत आर्ततेने विनवित असतांना शंकर बाबाचेडोळे आनंदाश्रूनी भरुन आले. अशा अवस्थेत ते वर्धा तीराजवळील एका ओढ्याजवळ बसले होते. तोच काय चमत्कार ! एक शिळा त्या ओढ्याचे काठावरुन खाली ओढ्यात पडली व पुन्हा तीच शिळा वर आली. जेथून ती पडली तेथेच पुन्हा गडबडत वर गेली. शंकर बाबाचं लहानु नामस्मरण सुरुच होतं. तेवढ्यातच एक साप त्या ओढ्यातून भराभर त्यांचेकडे आला: तो शंकर बाबाचे सभोवती फिरुन मांडी वरुन निघून गेला. या घटनेने शंकर बाबा थोडे सुद्धा विचलित झाले नाही. तर ते पुढे पुढे साधनेत व नामस्मरणांत जास्त रममाण होवू लागले. त्यांना कधी कधी असे वाटायचे की, आपण बाल धृव किंवा प्रल्हादा प्रमाणे कठोर तपश्चर्या करावी. सर्व प्राणीमात्रांशी मैत्री साधावी आणि मग 'चित्त शुद्धतरी शत्रू मित्र होती, व्याघ्र ही न खाती सर्प तया' या प्रमाणे घडावे आपणात वृक्षाप्रमाणे तटस्थता निर्माण व्हावी असे त्यांना वाटायला लागले.

त्यांना पुढे पुढे एकांतवास आणि मौनव्रत अधिक प्रिय वाटू लागले. एकदा नोकरी करतांना शेतात ज्वारी सोंगण्याचे काम सुरु होते. ते शेतात गेले पण तेथे गेल्यावर विचार बदलला. आपण प्रथम ध्यान-धारणा करावी व नंतर सोंगण्यास सुरवात करावी, असा विचार करुन ते ध्यानांस बसले आणि थोड्या वेळातच संत लहानु चिंतनात एवढे रममाण झाले की, दिवस केंव्हा बुडाला याचं भानही त्यांना राहलं नाही. जेव्हां ध्यानांतून उठले तेंव्हा पाहतात तर काय! जी ज्वारी आपण सोंगणार होतो, ती कोणीतरी सोंगून ठेवली होती. बरे, ते काम करण्यास दुसरे कोणीच आले नव्हते. कुणी बरं केल असावे हे काम? त्यांनी ओळखल! ज्याचं आपण ध्यान

करीतो आहे, त्या सद्‌गुरुरायानेच हे कार्य (काम) पूर्ण केले असावे. ''सद्‌गुरु सारिखा असता पाठी राखा इतरांचा लेखा कोणकरी !'' त्यामुळे तर शंकर बाबाचे गुरुप्रेम व गुरुभक्ती अधिक बळकट झाली!

१९६१-६२ साली रामा मेश्राम सोबत शंकर बाबा सद्‌गुरु लहानुजीचे दर्शनास टाकरखेडी गेले. तेंव्हा दर्शन घेत असतांना लहानुबाबांनी दोन्ही हात डोक्यावर धरले व म्हणाले 'भूवयांत लेका डोया घे! अक्कल साया!! ह्या घटनेनंतर काही दिवस लोटलेत आणि पुन्हा ते दर्शनास गेले. तेव्हा प्रसाद म्हणून दोन टरबूजे शंकर बाबानी नेली होती. संत लहानुबाबा समोर प्रसाद ठेवला त्यापैकी एक टरबूज परत करतांना संत लहानुजी म्हणाले ''तोच डोया होय! आता घेतला डोया लेकानं!'' आणि तेंव्हापासूनच शंकर बाबाला ध्यान धारणेत आत्मसूर्य दिसू लागला आणि तोच आत्मसूर्य म्हणजे डोळा होय! अशी निरंतर कृपा संत लहानुजींची शंकरबाबांवर होत राहिली. त्यांना गुरुमाऊली अतिशय प्रिय वाटू लागली. गुरुमाऊली आवडली आणि शंकरबाबा म्हणायला लागले - लहानुजी गुरुमाय! आवडे.....!

## ९) श्री लहानु महिमा

लहानुजी गुरुमाय! आवडे ॥धृ॥

धन-संपत्ती काही नको रे। सत्ता महती, ती ही नको रे॥
एकच गुरुचे पाय! आवडे... ॥१॥

वैराग्याचा हा जणु पूतळा। भवसागराशी तारण्याला॥
कपील तोचि लहानु होय! आवडे... ॥२॥

भक्ती मनाला जडली तयाची। प्रीती तुम्हावरी जडे तयाची॥
पडे उणे मग काय! आवडे... ॥३॥

असा कालक्रम सुरु होता. शंकर बाबाचे मित्र विठोबाजी राधोंते यांचा मुलगा बिमार होता. औषधाने व डॉक्टरकडे जाऊन सुद्धा मान येत नव्हता, म्हणून दोघेहि टाकरखेडी गेलेत. प्रसाद ठेवला, पण आत्मज्ञानी

लहानुबाबाने सांगितले ''कवळे वेलाचे सडले, तोडून दे आता. आता कुठं भटकता'', असे मार्गदर्शन केले. सेवकांना सुद्धा अगदी योग्य व सुचक मार्गदर्शन करायचे आमुचे लहानुनाथ!

असाच एक प्रसंग! शंकरबाबा वर्धातीरी सहज ध्यानस्थ बसले होते! रात्र केंव्हा झाली हे कळले सुद्धा नाही. त्याच रात्री त्याच ठिकाणी शंकर बाबाला दूर अंतरावरुन आवाज ऐकू आला. ''मी चराचरांत आहे.! स्वधर्माला अनुसरुन भावभक्तीचा पाया प्राजंळपणे पाळीत असेल, त्याच्या मी अगदी निकट आहो. लहानु नामस्मरण करीत राहा! तुझे कल्याण होईल!''

हे शब्द ऐकताच शंकर बाबा सावध झाले आणि पाहतात तर काय? जवळपास कुणीच नव्हते. तेवढ्याच रात्री ते गावात यायला निघालेत पण वाटेवर दोन लांडगे वाट अडवून बसले होते. लहानु नामस्मरण शंकर बाबाचे सुरुच होते.आणि तेवढ्या रात्री तेथे एक तरुण गृहस्थ आला. त्याने ते लांडगे दूर हाकलून दिलेत.

या घटनेनंतर काही दिवस गेल्यावर शंकर बाबा टाकरखेडी संत लहानु दर्शनासाठी गेलेत. तेव्हा लहानुबाबा म्हणायला लागले ''रात्रीचे लांडगे''! कसे होते!! उठा बे साये हो!! रस्ता नका रोखू''! अशा अनेक प्रसंगातून ह्या संतश्रेष्ठांने मार्गदर्शन केले. तेव्हा शंकरबाबा सुद्धा सर्व लोकांना संत लहानुमहिमा सांगू लागले. खरा देव कोठे आहे. ते शंकर बाबा सांगताहेत....!

## १०) श्री लहानु मंत्र

संत लहानुजीचा मी मंत्र जगा सांगण्या
खरा देव कोठे तो! सर्व लोका दाविण्या ।।धृ ।।

कोण आहे कुणा? सांगा ? जगती कोणी ना कुणा।
चालतीचे सोयरे! पण साथ देई कधिच ना ।।
सर्व जगती एक ईश्वर – तत्व जगी समजण्या ।।१ ।।

विदर्भाची गंगा– पवित्र वर्धा असे।

नीर तिचे खळखळतांना संदेश ही देतसे ।।
लहानुजी मंत्र जगी-सकलांना सांगण्या... ।।२ ।।
प्रेमभक्ती सांगूनिया - मुक्तीमार्ग शोधिला ।
लहानुवचन पावूनिया-कृतार्थ देह जाहला ।।
रंजल्या नि गांजल्यांना हृदयाशी लावण्या... ।।३ ।।

संत लहानुनाम नामस्मरणाने व वेळोवेळी त्यांच्या मार्गदर्शनाने पवित्र झालेलं मन संत लहानुजींच्या सांगण्याप्रमाणे कार्य करायला लागले. त्यांनी दिलेला प्रसाद ग्रहण करायचे. संत लहानुनाथ सर्वासमक्ष शंकर बाबाकडे पाहून म्हणायचे, ''आपला होय! आपला होय बरं!!''

एकदा तर त्यांनी ४० दिवसाचा उपवास शंकर बाबास सांगितला. उपवासाने मन व अंत:करण शुद्ध होत असते. उपवास सुरु होता. काही दिवस लोटले. त्यातच शंकरबाबा जाळीचे मारोतीचे मंदिराकडे एकटेच फिरायला गेले. वाटेतच त्यांना चक्कर आली आणि ते बेशुद्ध होऊन पडले. बराच वेळ त्या ठिकाणी बेशुद्धवस्थेत पडले होते.

त्या ठिकाणी एक ८० वर्षाचा म्हातारा धनगराचे वेषातील, काठी टेकवीत व हातात पाण्याने भरलेला तूंबा घेवून आला. त्याने बेशुद्ध पडलेल्या शंकर बाबांचे तोंडावर पाणी शिंपडले आणि त्यांना सावध केले, पाणी प्यायला दिले. तो म्हातारा म्हणाला. ''कोठेही पडून राहावे काय?'' म्हाताऱ्यानी काही प्रश्न शंकर बाबांना विचारले.''तुझा गुरु कोण? तो तुला काय शिकवितो?'' सर्व प्रश्नांची उत्तर म्हाताऱ्याला बरोबर मिळालीत, तेव्हां तोच म्हातारा पुन्हा म्हणतोय ''तुझे लहानुबाबा तुझे कल्याण करतील! तू त्यांचे चरण सोडू नकोस!'' असे म्हणून म्हातारा निघून गेला. काही अंतरावर गेल्यावर तो दिसेनासा झाला. त्यानंतर शंकर बाबा उठले आणि बाजूच्या टेकडीवर चढून त्या धनगराचा व त्याच्या मेंढ्याचा शोध घेवू लागले. पण तेथे धनगर नव्हता

नि मेंढ्याही नव्हत्या!

ह्या प्रसंगानंतर शंकर बाबा टाकरखेडी दर्शनास गेले. तेंव्हा लहानुबाबा शंकर बाबाकडे पाहून हसले आणि म्हणाले, ''तुंब्यातील पाणी गोड लागते. आणि गोष्टी गोडगोड सांगितल्या'' त्यांनी शंकरबाबास उपवास सोडण्यास सांगितला. म्हणाले ''भाजी भाकर खावी.''असा हा संत लहानु शिवशंकराचाच अवतार होय. त्यांनी आपणा सर्वांना एकच धर्म शिकविला. त्या शिवभोळ्या लहानुजीला शंकरबाबा म्हणतात - काय म्हणातात ते....!

### ११) सख्या शिव भोळा...!

सख्या शिव भोळा। आम्हा धर्म एक शिकविला!
सख्या लहानु नाथा आम्हा धर्म एक शिकविला!!
सर्व मानवासी तू - समत्त्वाने वागला।।धृ।।

जाती धर्म नाही देवास ठावे-स्वार्थी जनांचे हे भलते कावे।।
गोड बोलूनिया रंक-दलित राबला।।१।।

ज्ञानदेव, तुकड्या, नामा। चोखा-गोरा-सेना।।
जात-पात नाही पुसली। कधिही तू कुणा।।
प्रेमभक्ती पाहुनिया - शिवभोळा मोहिला।।२।।

धर्म मानवाचा एक - आता शिका प्रेमे।
समान धर्माने नि - माणूसकीच्या नेमे।।
लहानु-लहानु म्हणता जो तो - लहानुरुप जाहला।।३।।

असा हा शिवभोळा लहानुराजा कसा होता बरे? एकदाचा प्रसंग आहे! श्रीराम पाटील इंगळे-कावलीचे. त्यांच्या मातोश्री श्रीमती गिरजाबाई इंगळे ह्या संत लहानुबाबाच्या निस्सीम भक्त! त्यांच्या शेतातील गोड असा आम्रवृक्ष वाळला होता. त्याचे इंधन तोडून घरी आणणे सुरुही झाले होते. आईच्या प्रेमळ अंतकरणाला अतीव दु:ख होत होत. त्यांनी मजुरांना सांगीतले. आंब्याचे

इधन आणणे बंद करा. तोडू नका त्याला. माझं अंतकरण, विदीर्ण होत आहे. त्यांनी घरीच जागा सारवली. अत्यंत विनम्र भावे व कळवळ्याने श्री संत दयाधन लहानुनाथाचा धावा केला, व अंगारा करुन तोच अंगारा लहानुनाम घेवून त्या वाळलेल्या आंब्याचे झाडाला दिला. तो काय चमत्कार ! तो आम्रवृक्ष पुन्हा वसंत पर्णानी बहरला !! त्याला नवजीवन मिळाले व आंबेही लागलेत. ते आंबे घेवून संत शंकर बाबा सोबत श्रीराम पाटील इंगळे टाकरखेडी गेले. तोच संत लहानुबाबा म्हणाले ''वाळल्या झाडाचे आंबे गोड लागते.'' मेलेल्यातही प्राण निर्माण करण्याचे सामर्थ्य लहानु नामस्मरणात साठवले आहे.

तेच नाम चिंतन करीत पिंपळखुटा गावी आमुचे शंकरबाबा घरीच एका छोट्याशा खोलीत बसायचे आणि म्हणायचे, ''या गावात सर्वेश्वर येणार आहे. तुम्ही त्याला जागा द्याल का?'' अगदी साधे-सोपे संभाषण, सुंदर व स्वच्छ व निर्मळ अशा वातावरणात लहानु चिंतन मग्नतेत दर्शनाला येणाऱ्या भाविक भक्ताशी बोलायचे. त्या बोलण्यातून पुष्कळांना चांगले अनुभव व अनुभूती यायला लागली. त्या ठिकाणी आमुचे शंकरबाबा कसे दिसत होते. - भाविक भक्तगण म्हणतात, काय म्हणतात ते....!

## १२) माझे संत शंकरबाबा

माझे संत शंकरबाबा। वशिष्ठे तीरी वास करी ।।धृ।।

टाकरखेडी वारी करुनी। लहानुजीचे दर्शन घेवून ।।
गुरु पादूकेला प्रेमे स्थापुनी। बसविल्याच घरी ।।१।।

भजन प्रवचन करुन जागवी। अडाणी भक्ता- मार्ग दाखवी ।।
वृत्ती सदा निष्काम असावी। तेचि भजन ईश्वरी ।।२।।

व्यसन मुक्तीचा मार्ग सांगूनी। अभिमानवृत्ती सोडूनी
परिश्रमाने जगा शिकवूनी। सांगे शंकर हरि ।।३।।

दिवसा मागून दिवस जावू लागलेत. शंकरबाबानी टाकरखेडी जावे, दर्शन घ्यावे आणि तेथून येवून पुन्हा आपल्या अलमस्त स्थितीत राहावे. येणाऱ्या दर्शनार्थींना यथायोग्य मार्गदर्शन करावे. असे असतांना शंकरबाबांची कीर्ती हळू-हळू पसरु लागली. लोक दर्शनाची गर्दी वाढली. ध्यान-धारणा-भजन-पूजन सर्व काही गावातील छोट्याशा खोलीत घरीच सुरु असायचे. श्री संत लहानुकृपेने ते सर्वांवर प्रेम करायचे, तो अनुपम सोहळा आणि प्रसंग कसा असायचा, आणि त्या तसल्या अवस्थेतच आमचे शंकर बाबा कसे दिसायचे! सर्व भाविक मंडळी वर्णन करीतात...!

## १३) सुंदर खोली परिसर पावन

संत शंकर बाबा आमुचे। लहानुजीचे नामउचारी।
वर्धातीरी वसती। तयाची कीर्ती परि भूवरी।।धृ।।

सुंदर खोली-परिसर पावन। त्यातही बाबा दिसती शोभून।।
रोज सकाळी भक्त मंडळी। गाती लहानु हरि।।१।।

शुभ्रवस्त्रा करिती धारण। लहानु चिंतनी जाती रंगून।।
साधे सोपे करी संभाषण। आत्म बोध-अंतरी।।२।।

शुद्ध तत्वा नि मानव धर्मा। पटवून सांगे निष्काम कर्मा।।
मानवतेच्या खऱ्या वर्मा। शोधा (हृदय मंदीरी) हृदयांतरी।।३।।

पिंपळखुट्यास घरीच बाबाकडे भक्तगण यायचे. कार्यक्रम चालायचे. त्यावेळी काही विरोधक टवाळ्याही करीत असायचे, विरोध ही करायचे. पण शंकरबाबा तिकडे लक्ष न देता ते लहानुचिंतनात व ध्यानात मग्न असायचे. विरोध जसा जसा वाढतो तस-तसे संताचे कार्य नेटाने जोमाने पुढे सुरु राहते. शंकर बाबाची प्रचिती भाविक भक्तांना जसजसी आली तसतसे भाविकांनी बाबांवर प्रेमाचा वर्षाव केला. आपल्या ध्यानावस्थेतून शंकर बाबा भक्त मंडळींना सांगायचे - काय म्हणायचे ते...

## १४) सर्व लेकरे एका प्रभूची

सर्व लेकरे एका प्रभुची। भेद असा कुणी केला ।।धृ ।।

स्वार्थी जनाचे भलते कावे-धर्म-पंथ बहू जगी वाढावे ।।
गरीब अडाणी फसविण्याला - भेद असा हा केला ।।१ ।।

वर्णवादास, जाती भेदास, कणखरतेने तोंड देण्यास
एकीचे जाणा सत्यास भेद कसा हा केला ।।२ ।।

दगडातूनी मूर्ती घडते - देवरुप मग त्याला येते।
विसरु नका देवाला - भेद लयाला गेला ।।३ ।।

पुरुषार्थने माणूस घडतो - परमार्थे व्यवहार ही शिकतो।
सोडू नका प्रेमाला, सोडू नका भक्तीला ।।४ ।।

दिवसामागून दिवस भराभर जावू लागले. शंकर बाबावरची प्रीति असणाऱ्यांची संख्या वाढतच गेली. लोकांना आलेली प्रचिती, अनुभूती व अनुभव शंकर बाबाचं मार्गदर्शन संत लहानुजींचेच ते कार्य आहे असे समजून करायला लागलेत. ''माझे नच काहीहि सद्गुरुने सर्व दिले.'' असे ते म्हणत! निष्काम भावनेतून केलेल मार्गदर्शन. त्यांच्यां दर्शनाचे भाविक भक्तांचे जीवाला जीवनाचा अर्थ उमगला. भाविक भक्तगण म्हणू लागलेत...!

## १५) संत शंकर दर्शने

संत शंकर दर्शने - अर्थ जीवा कळला।
मानवता नटली सजली - सत्य मार्ग धरिला ।।धृ ।।

लहानु -शंकर नामस्मरणे - रंगी रंगू द्यावी वाणी।
सहज समाधी लागे - भेट देई चक्रपाणी ।।
जीवनाची सार्थकता - वाटे माणसाला ।।१ ।।

मानवधर्म समजला - तोची सर्व जगताला।
जगी नाही श्रेष्ठ गड्यारे - मार्ग दुज्या कोणाला ।।

शंकर बाबा सांगतांना कंठ भरून आला... ॥२॥

जयालाहि आहे गोडी - दर्शना येवोनी ॥
ऐकू येते कर्णी - बोधाची मधूर वाणी ॥
भक्तगण लीन होती - स्पर्श होता चरणाला... ॥३॥

श्री संत लहानु राजांची पूर्ण कृपा पावलेले संत शंकराची कीर्ती सुगंधा सारखी दरवळू लागली. गर्दी वाढली. आणि त्यामुळे बाबांना वाटायला लागले की, आपण या लोकपणापासून दूर राहावे. एकांतवासात राहून ध्यान मग्न स्थितीत सदोदित राहावे. हे पिंपळखुटा गाव सोडून कुठे तरी दूर निघून जावे. शंकरबाबांची ही स्थिती लक्षात येताच दर्शनार्थी हरिभक्त दूर्गावास भूतडा, दहेगाव मुस्तफा बाबाला म्हणाले, ''बाबा, तुम्ही आमचे गावी चला. आम्ही तुम्हाला आश्रम बांधून देतो व आश्रमाला शेतीही देतो.'' हे शब्द पिंपळखुटा येथील काही भक्तांनी ऐकताच श्री पुंडलिकराव रुद्रकार व त्यांच्या कुटूंबियांनी शंकरबाबाला म्हटले, ''आम्ही येथेच शंकरबाबाला शेतही देतो आणि आश्रमही बांधून देतो. मात्र बाबांनी पिंपळखुटा सोडून जावू नये! सर्वजन परोपरीने विनवू लागलेत. तेव्हा शंकर बाबांनी सर्वांना एकच सांगितले की, ''आपण सर्वजन टाकरखेडी जावू आणि तेथे सद्‌गुरु लहानुजी जो आदेश देतील तो मी मान्य करील''! गुरुपौर्णिमेला सर्वजन टाकरखेडी गेलेत. संतश्रेष्ठ लहानुनाथापुढे प्रसाद ठेवला. तेव्हा ते म्हणाले की आपलं जूनं गावच चांगल राहील. ती बुढी शेत द्यायले तयार आहे. तेच घ्यावं. जिकडून गाव वळणीच पाणी पडते तेच घ्यावं''. हे संत लहानुजीचे शब्द शंकर बाबांनी पाळले. शेत मिळाले व त्या ठिकाणी सर्वांनी मिळून आश्रम उभारणीचे कार्य सुरु केले. सर्व भक्तांनी आनंद व्यक्त केला व लहानुजी महाराजांचा जय जयकार केला!

# १८) संत लहानुजी बाबा

संत लहानुजी बाबा संताचे संत।।
लागेना त्यांच्या महिमेचा अंत।।धृ।।

आडकोजी बाबाचे वैराग्य अंगी।
''रामकृष्ण गोविंद''! नामांत रंगी।।
मानवतेचा हा थोर महंत... ।।१।।

मानव धर्माची दिक्षा देवूनी।
जागृत करी तो-ज्ञानी-अज्ञानी।।
सत्य तोचि देव गर्जत गर्जत।।२।।

भाविकांनो घ्यारे-लहानु दर्शन।
दर्शन मात्रे त्यांच्या-होवू या पावन।।
महिमा लहानुची-गावू भजनात।।३।।

आश्रमाचे बांधकामासाठी श्री संत सत्यदेव बाबानी दोन रुपये दिले व ''काम होते'', असे म्हटले. त्यावेळी शंकर बाबा जवळ फक्त २०० रुपये होते. पण सर्व भाविकांच्या प्रेमळ सहकार्याने, तन-मन-धनाने अवघ्या दोन महिन्यातच आश्रम बांधून पूर्ण झाला. दोन रुपये - दोनशे रुपये आणि दोन महिने हा योगायोगच म्हणावा लागेल. इ.स. १९७२ साली बांधकाम झाले व त्याच वर्षी आमचे प्रिय संत सत्यदेव बाबांच्या प्रेरणेने ''रामनवीमच्या'' उत्सवास सुरुवात झाली. सर्वच उत्सव काळात आनंदी मनाने आमुचे संत शंकर बाबा सर्वासोबत काम करु लागलेत. संत लहानुकृपा, संत सत्यदेव बाबाच्या प्रेरणेने श्री शंकर बाबा सर्वांना निष्काम वृत्ती, ईश्वर भजन, व्यसन मुक्ती, प्रामाणिक परिश्रम, देवदर्शन या माध्यमातून सत्यज्ञान देत आहेत. तसेच ध्यान, प्रार्थना, सामुदायिक विवाह आदिचे महत्त्व आजच्या परिस्थितीत कसे काय आहे हे कथन करतात.

हे कार्य सुरु असतांना विरोधकांचा विरोध सुध्दा सुरु असायचाच. पण संत त्या विरोधाला न जुमानता त्यांचे कार्य नेटाने सुरुच ठेवीत असतात. ते कधीही कुणावर रागावतही नसतात. संत हृदय संथ असते. पवित्र असते, शांत असते. दया-क्षमा-शांतीचे संत आगार होय! सर्व भक्तगण शंकर बाबाला वंदन करून म्हणतात...!

## १७) सर्व लेकरे प्रभूचि

शंकरबाबा सकळा कळू दे। मानवता जगी या।।
वाढो जगती भूत दया।।धृ।।

ग्रहण लागले भारत देशा-भिन्न धर्म नि भिन्न वेषा।
सगळ्यांना स्वार्थी अभिलाषा - कोण येई तारण्या।।
धर्म म्हणूनी अधर्म वाढे - प्रेम भक्तीचे तया वावडे।
कैसे मानव जगती बापुडे। काय, म्हणावे या?।।१।।

बाबा तुम्हीच सांगीतले। भविष्य काळा तुम्ही जाणिले।
भाविक भक्ता जागृत केले। सोडू नका हो सत्त्या।।
सत्त्यमार्गी लपली मानवता। तरेल मानव कुठे न जाता।।
जाती पंथ जरी जगी राहता। ममता जाई लया।।२।।

शंकर बाबा सांगे एकचि। लेकरे आम्ही सर्व प्रभूचि।
होळी करा भेदाभेदाचि। कळो वळो सकला या।।३।।

अशा रीतीने आश्रम स्थापन झाला. त्यानंतर भाविक भक्तांनी बाबांना खूप खूप मदत करून, श्रम प्रतिष्ठा, समाज प्रबोधनासाठी निरनिराळ्या कार्यक्रमाची आखणी करून, तसेच आयोजन करून, मानव धर्म जागृतीचे कार्य सुरु झाले. संत शंकर बाबाला त्या कार्यक्रमाचे निमित्ताने गावोगावी बोलावून उत्सव साजरे होवू लागलेत. चित्ताला समाधान, अनाथाला दिलासा, दु:खितांना विसावा देणाऱ्या संत शंकर बाबांच नाव कुणाला बरं

आवडणार नाही. नाम स्मरणात सर्व भाविक दंग होवून जातात. जणु काही बाबांच्या नामस्मरणात स्वर्ग साठला आहे असे वाटायचे. संत लहानुनाथ, संत सत्यदेव बाबा आणि शंकर बाबांच्या नामस्मरणाने एकरूप होवून जात, ''हरिगुण गावत नाचुंगी, मै प्रभू गुण गावत नाचुंगी,'' सारखी स्थिती भाविक भक्तांची होत असायची. सर्व भाविक बाबांना आशीर्वाद मागायचे व म्हणायचे ''बाबा, आम्हास हा कठीण भवसागर तरण्याचा मार्ग सांगा!

## १८) धावत येई संत शंकरा

''धावत येई संत शंकरा, धावत येई दयाळा ।।धृ ।।

तुझ्या दयेने आज हलाहल, आम्ही ते पचविले।
अंतरीच्या या भावा जाणूनी सत्य मार्ग दाविले ।।१ ।।

गरीबांना नच जगी विचारी अडाणी जनता तसीच बिचारी।
हात धरोनी-मार्ग खरोखरी - तुम्हीच दावियले ।।२ ।।

लहानु नामे - लहानु रूप होणे - तुमच्या योगे शिकलो जीणे।
प्रपंच सागर तरूनही जाणे आम्हासी समजले ।।३ ।।

आश्रमाचे सर्व कामकाज संत शंकर बाबाचे नावानेच चालत असल्यामुळे व सर्व गोळा होणारा पैसा, सर्व शेती ह्याची मालकी शंकर बाबाचीच राहील, ही सर्व संपत्ती त्यांचीच होईल की काय, म्हणून विरोधकांनी जोरात अपप्रचार व बदनामी सुरु केली. परंतु संत शंकर बाबांना हे काहीही नको आहे. त्यांनी दु:ख प्रदर्शित केले व सर्व प्रेमळ भाविक भक्तांना एकत्रित बोलावून आश्रमाची सर्व संपत्ती व शेतीचा ट्रस्ट केला. संत शंकर बाबा आश्रम ट्रस्ट नं. अे. १६७० या नावानेच आज कार्य चालत आहे. स्वार्थी वृत्ती माणसात बळावली की पशुलाही लाजविल अशी नीच व हीन प्रवृत्ती त्याचेमध्ये निर्माण होते. संत शंकर बाबा सर्व भक्त मंडळींना म्हणाले, ''अरे, मला संपत्तीचे व ऐहिक सुखाचे काय करायचे आहे. मला

माझ्या माय माऊली लहानुनाथाने, संत सत्यदेव बाबाने सर्व काही दिले आहे. आनंदी आनंद आहे. ज्ञानेश्वर गेले. नामा गेला. तुकाही गेला. सर्वांनाच आपलं कार्य करुन या जगाचा एक दिवस निरोप घ्यावाच लागणार आहे. मला सुध्दा या मृत्युमय जगाचा निरोप एक ना एक दिवस घ्यावाच लागणार आहे मी कशाला मोहमायेत पडू?'' आणि असे म्हणतच त्यांच्या मुखातून खालील शब्द निघालेत...!

## १९) मानवतेला जागवा

मानवतेला जागवा हे चि तुम्हा बोललो ।।धृ ।।
लीन तव चरणावरी मी लहानुगाथा जाहलो।
आज वरी ही तव कृपेने, अमृत डोही नाहलो ।।१ ।।

नामा, तुक्या, गोरा गेला, चोखोबाजी, सावता।
ज्ञानदेवादिक सारे, ते ही नाही कुणी आता ।।
अमर कोणी ना जगी या, कीर्ती रुपे राहलो ।।२ ।।

• क्षमा करा रे आज मजला–चुकलो असेल मी काही जर।
सत्य तेचि बोललो–नि वर्तलो मी आज वर।
लोक क्षोभा ना मनीही – ना कधि रागावलो ।।३ ।।

नका होवू कोणी दु:खी – आनंद माना अंतरी।
हेचि तुम्हा सांगतो – विसरु नका कर्मापरी ।।
मानवतेला जागवा – हेचि तुम्हा बोललो ।।४ ।।

काही दिवसाने शंकर बाबा परमहंस लहानुजींचे दर्शनास गेले असता ते धर्मशाळेच्या कार्यालयामध्ये बसले होते. वेळ सकाळची होती. संत लहानुजींच्या आवाजात क्षीणता आलेली होती. त्यांनी शंकर बाबास जवळ बोलाविले आणि त्यांना ओली फरशी पुसण्यास सांगितले व त्यांच्या डोक्यावरील ओला शेला उन्हात वाळत टाकण्यास सांगितले. तेंव्हा शंकर

बाबाने श्री लहानुजींना हळूच विचारले, ''बाबा आम्हाला आश्रमात अखंड वीणा सुरु करायचा आहे.'' तेव्हा ते म्हणाले, ''कुठ लावता बे विणा! सांभाळ जो मग उद्या. आम्हाले इथून आता लवकर जायचं आहे. आता करनं सुरु,'' असे म्हणून शंकरबाबा व चर्जन बुवास प्रसाद व तंबाखू दिला. जणु काही दिव्य ज्ञानदृष्टी व शक्ती प्रदान केली!

शंकर बाबा त्या दयाघन सद्‌गुरुनाथ लहानुजीला म्हणतात, ''सद्‌गुरुनाथा, तू आम्हास प्रेम दिले, ज्ञान चक्षू दिलेत. भक्ती-मुक्तिचा आनंद व सोहळा कथन केला. तू धन्य आहेत''!

इकडे संत लहानुने डोळे मिटविले आणि आपल्या गुरुदेव आडकोजी कडे तोंड वळवून म्हणाले, ''गुरुमाउली! आडकोजीनाथा!! आता आम्हाला आज्ञा द्यावी. आम्हाला आता येथुन या नश्वर देहाला सोडून जायचे आहे.'' ते म्हणतात....!

## २०) मुक्तीचा आनंद !

जातो आता गुरु माऊली।
मी सोडूनि तव पाऊला।।धृ।।

राहिलो मोदे इथे - सगळ्यास देवूनी प्रेमचि।
इच्छा न मानसी काहीही - जगणे ही झाले सार्थचि।।
लाभले मज ज्ञान चक्षू -· स्पर्शिता मी तव पदाला।।१।।

मानव धर्मा शिकवूनी - जागविली मानवता।
ना समजली अज्ञ जनता - स्वार्थी वृत्ती ठेवितां।।
अर्पिले सगळेच जीवन - भेद आता सोडीला।।२।।

मुक्तीचा आनंद लाभे - सोहळा तो पाहिला।
देह नश्वर सोडतांना - मन्मना आनंद झाला।।
वशिष्ठेचे तीर्थ द्या मज - धन्यता वाटे जीवाला।।३।।

अशा प्रकारे ह्या मर्त्य जगाचा निरोप घेण्यास संत लहानुनाथांची परीपूर्ण तयारी झाली. काही थोडा काळ पुढे गेला. पावसाळा आला. सद्गुरु लहानुनाथाची प्रकृती दिवसेंदिवस ढासळत चाललेली होती. त्यांच्या अवतार समाप्तीची वेळही जवळ येत चालली होती. सर्व भक्त मंडळींना हे आश्रमात कळताच त्यांनी टाकरखेडा जाणे सुरु केले. संत शंकर बाबा सुद्धा त्यावेळी लहानुनाथा जवळच होते. पावसाचे दिवस असुन सुद्धा पाऊस येत नव्हता. तेव्हा तसल्याहि स्थितीत साऱ्या विश्वाची चिंता वाहणारे आमचे संत लहानुराजे त्या दयाधन वरुण राजाची प्रार्थना करतात. त्रिकालज्ञानी, सर्व शक्तीमान असलेल्या लहानुजीने शेवटच्या क्षणापर्यंत लोकहितासाठी कार्य केले. ते म्हणतात – ''लोक म्हणते, पाणी येत नाही, पाणी येत नाही; आले बॉ, होऽऽ हे घ्या देल्ल. दिलं, पाह्यजो आता, जाव लागते आता चाललो,'' असे म्हणतच त्या संत योग्याने समाधी योग साधला.

श्री संत परमहंस लहानुराज आपणा सर्वांचा निरोप घेवून रक्षाबंधनाचे दिवशी संत शंकरास रक्षा बांधून अनंतात विलीन झाले. इकडे आकाशातूनही दु:खाश्रुच्या धारा कोसळू लागल्या आणि समस्त भाविकांचे कंठ शुष्क झालेत, त्यांच्याही नेत्रातून अश्रुंचा महापूर लोटला. संत शंकर बाबाच्या डोळ्यातून अखंड अश्रूधारा वाहात होत्या. त्यांचा कंठ दाटून येत होता. आणि त्यांच व्यथित अंतर्मन म्हणत होते, सद्गुरु लहानुनाथा तू आपल्या हृदयी दीप लाविले, ज्ञानदीप लाविले....!

## २१) लहानुजी सदगुरु हृदयी दीप लाविले

वर्धातीरी गुरु माझे – समाधिस्त जाहले।
लहानुजी सद्गुरु – हृदयी दीप लाविले।।धृ।।

कर्मयोग बालपणी मजलाही शिकविला।
ज्ञानमार्ग सांगुनिया – भक्तिमार्ग दाविला।।
लहानुगुरु कृपावंत – थोर अति जाहले।।१।।

गुंतलो मी गुरु वचनी, परंपरा चालविण्या।
अध्यात्मा जागविण्या, ब्रह्म स्वरूप दाखविण्या।।
शांतीरुप गुरु माझे - समाधिरत्त जाहले।।२।।

गुरुमुर्ती विसावली, पवित्र वर्धा स्थळी।
मानव धर्म दावूनिया - मानवता जागविली।।
परंपरेत संतांच्या - मालिकेत गोविले।।३।।

सद्‌गुरु लहानुनाथाने समाधी योग साधल्यावर बराच काळ श्री संत शंकरबाबांनी मौनात व गुरुच्या विरहाच्या चिंतनात घालविला. पण संत सत्यदेवबाबाने त्यांना स्वत:चे मोटार मध्ये बसवून सालबर्डी येथे नेले, आणि तेथील शिव शंकराचे पिंडीसमोर मौन व्रत सोडावयास लावले. टाकरखेडला त्यानंतर सद्‌गुरुनाथ लहानुचे भव्य मंदीर उभारणी कार्य सुरु झाले. संत शंकरबाबाने श्री संत लहानु मंदिराचे कळसाचे काम स्वत:कडे घेवून पूर्ण केले. आज श्रीसंत लहानु मंदीरात श्री गुरुरायाची मनोवेधक संगमरवरी पाषाणाची मूर्ती बसविली आहे. प्रत्यक्ष जणू संत लहानुनाथ आजही तेथे बसले आहेत असा भास होतो, नाही - नाही प्रत्यक्षच आहे! आजही भाविकांच्या मनातील मनोकामना पूर्ण करतात. इकडे संत शंकर बाबाने सुद्धा पिंपळखुटा आश्रमात आपल्या प्रिय गुरु माऊलीचे पुण्यतिथी व वाढदिवसाचे उत्सव सुरु केलेत. श्री संत लहानुजीचे गुणगाण करीतात..!

## २२) श्री संत लहानुजी

असा हा लहानुजी अवतार।
करीतो भक्तांचा उध्दार।।धृ।।

धन्य धन्य हा योगीराज। ज्यांचा त्रिभुवनी असे ध्वज।
तयास माझा असो दंडवत।
अशीच भक्ती घडो **निरंतर, करीतो** भक्तांचा उध्दार।।१।।

वर्धेमाजी स्नान करोनी, भक्तांसवे भारत भ्रमणी।
लावूनी ध्याना, वर्धा काननी। शिव महिमा अपार।।२।।

तया चरणी माथा ठेवूनी। सद्भावे या शरण जावूनी।
साक्षात शिव रुपा पाहूनी। मनी आनंद अपार।।३।।

वर्षभर निरनिराळ्या उत्सवात सर्व भाविक तन-मन-धनाने सहभागी होतात. सर्वांना कार्यक्रमाची संधी प्राप्त करून दिल्या जात आहे. समाज प्रबोधन, मार्गदर्शन, गुरु स्नेहभाव असे कार्यक्रम दिवसेंदिवस वृध्दिंगत होत चालले आहेत. असा हा संत लहानुजीचा शिष्य, मानवतेचा महान उपासक, संत लहानुरुपानेच आज आपणात आहे. आणि त्या संतश्रेष्ठाचे कार्य नेटाने पुढे चालवित आहे. पुढील संभाव्य काळाच मार्गदर्शन, सहकार्यांची भूमिका, भेदाभेद निती दूर करणे, एकतेची शक्ति वाढवित या देशास चांगले दिवस प्राप्त व्हावे, या साठीच "मानव-मानव सर्व एक होय, आणि मानवाचा धर्मही एक होय," असा मंत्र आमुचे प्रिय संत शंकर बाबा समाजाला देत आहेत. जरी समाजातील काही लोक विरोध करीत असतील तरी विरोधकांनाही एक दिवस सत्य समजेल आणि ते सुध्दा या कार्याला पुढे-पुढे वाहून घेतील ही शंकर बाबाची दृढ धारणा आहे. आजचे विरोधक उद्या भक्त बनून जोमाने कार्याला लागलीत. अशा प्रकारे दुःख जरी शंकर बाबांनी प्रदर्शित केले असलेतरी तेथे भाविक भक्तांची गर्दी वाढत चालली आहे. सर्व शंका-कुशंकाचे निरसन संत शंकर बाबांनी केले. आपल्या प्रेमळ भक्तांना दिव्यज्ञान दृष्टी देत आहेत. श्री बाबांच्या मधूर वाणीने सर्वजन सुखवतात. त्यांना जणुकाही अमृताचेच भोजन मिळत आहे. ते जेव्हा सद्गुरु लहानुनाथाचे ध्यान मग्नतेत असतात, तेव्हा सद्गुरु कृपेनेच त्यांच्या वाणीला फुलोरा येतो. आणि त्या स्थितीतच सर्व भक्तांना ही अशी ब्रह्मज्ञानाची अविट गोडी व आनंद लुटता येतो. ते सांगतात, गुरुमुर्तीला हृदयी धरा. स्वार्थी विचार सोडा. तेव्हांच प्रभूपदाची माया जोडता येते. प्रत्येकांचे दैवात जो भोग आहे, तो भोगावाच

लागतो. मात्र सद्‌गुरु कृपेने तो दूर पळतो. सर्व भक्त मंडळी हीच जणू शिवशंकराचे व लहानुनाथाचे रुप आहे. आपल्या प्रेमळ भक्तांना मरणाचे स्मरण ठेवावयास सांगतात, आणि त्या जाणीवेने जगण्याचे शिकवितात. त्यानेच आयुष्य धन्य होईल! अज्ञानी लोक अज्ञान दृष्टीने आज जरी त्यांना ओळखत नसले तरी उद्या सद्‌गुरु लहानुनाथ त्यांना सर्वांना सद्‌बुध्दी देईल, शक्ती देईल व भक्तीमती देईल!!

अशा विश्वात्मक दृष्टी लाभलेल्या श्री संत शंकर बाबाला वंदन करु या....!

## २३) वंदन करुया प्रिय संता

वंदन करुया प्रिय संता, शंकर बाबाला।
लहानुजींच्या प्रियोत्तमाला सद्‌गुरु रायाला।।धृ।।

अज्ञानी जीव गुंतलेला प्रपंची मोह मायी।
जरा न विसावा तयास कोठे, घ्या अपुले ठायी।।
कृपा दृष्टीने दूर करावे, अमुच्या मलीन मनाला।।१।।

तुझ्याविना जगती ना कोणी, आम्हास जगती आता।
तृषार्त जीवा शांत करा हो, पाजूनी ज्ञानामृता।।
नका लोटू हो दूर आम्हासी, तुजविण कोण आम्हाला।।२।।

प्रेमभक्ती शिकवूनी आम्हासी, करा शहाणे जगी।
जप-तप-ध्यान न काही ठावे, नच आम्ही त्यागी।।
भोळ्या जीवा उद्धरावे, आलो हेची मागण्याला।।३।।

विश्वात्मक दृष्टी द्या हो, जवळी बैसवा आम्हाला।
काही न त्याविण अन्य मागणे द्यावे ह्याची दानाला।।
अनाथाचे नाथ सद्‌गुरु तुम्हीच आहात जगताला।।४।।

भाविक भक्तांना त्यांच्या जीवनात काही चांगले अनुभव आलेत. त्यापैकी या जीवन दर्शनाचे लेखक भि. शा. खंडारे गुरुजी मंगरुळ दस्तगीर हे श्री संत शंकर बाबांचे परमभक्त होय. त्यांचेवर मध्यप्रदेशात त्यांच्या एका माथेफिरु नातेवाईकाने रात्री २.३० वाजता झोपेतच प्राणघातक हल्ला केला. सोयरिकसंबंधी ते गेलेले होते. त्यांचा प्राण जाणार तोच शेवटचे क्षणी गुरुजींनी ''शंकर बाबाऽऽ लहानु बाबा ऽऽऽ'' असा धावा केला. श्री संत शंकर बाबांनी तो त्याचा कळवळीने केलेला धावा ऐकला व भक्त संकटी धावून गेलेत. मध्यप्रदेशात पाढर येथील ख्रिश्चन मिशनरी दवाखान्यात शंकर बाबा डॉक्टरला येशू प्रभूचे रुपात दिसलेत. डॉक्टरांना शस्त्रक्रिया करण्यात व प्राण वाचविण्यास मदत केली. खंडारे गुरुजींचे प्राण वाचले व ते बाबाच्या पदी लीन झाले!! आणि त्यांच्या मुखातुन शब्द उमटले..!

## २४) व्दारी आलो शंकर बाबा

द्वारी आलो शंकर बाबा, द्वार उघडी आता।
तव कृपा आशीर्वादे, पुनर्जन्म प्राप्त होता।।धृ।।

आशा नव्हती जगण्याची, उजळती प्राण ज्योती।
नाम स्मरण - प्रभावाची, सत्य दाविली प्रचिती।।
जीवनदान दिधले मजला, शंकर-लहानु नाम घेता।।१।।

गुरुराया थोर महत्ती, कैसी सांगू सांगा आता।
कैवारी तू दीन-अनाथा, तूच आहे शंकरनाथा।।
तव पदी लीन जाहलो, देहभान मी हरपता।।२।।

हा दास जन्मोजन्मी, राहे संगती सोबती।
कृष्ण कन्हैय्याचे जैसे, तैसे आम्ही हो सांगाती।।
गोकुळीच्या सुखा येथे, पूर्ण रूपें अनुभविता।।३।।

दिवसेंदिवस भाविक भक्तांच्या झुंडीच्या झुंडी आश्रमात येत आहेत. त्याचप्रमाणे निर्माण कार्यात आपुला मोलाचा वाटा उचलीत आहेत. धन्य आहे, ही भक्त मंडळी की, हा जगन्नाथाचा कार्यरथ वेगाने पुढची वाटचाल करीत आहे. भव्य-दिव्य विश्वमंदिर भक्तीधाम बांधल्या गेले. दूर दूरचे पर्यटक-भाविक भक्त दर्शन घेणे, यज्ञयाग करणे रामजन्मोत्सवांत सर्वच कार्यक्रमांत सहभागी होणे व नेटाने नियमित कामे करण्यात रंगून जातात. कृपा आहे त्यांचेवर सद्‌गुरु समर्थ शंकर बाबांची!

भाविक भक्तांनी श्री गुरुराज लहानुजींची मुर्ती भक्तीधामी मधोमध बसवून संत लहानुजींचा व समस्त संतांचा जयजयकार केला. ते गातात व म्हणतात...!

## २५) भाविक साधकांनो

भाविक साधकांनो, मंदीर उभविले हे।
गुरुराज आमुचे हे, आम्हास भेटविले।।धृ।।

गुरु पाऊलेच तारक, संसारी माणसाला।
धरी घट्‌ट चरण हृदयी, तू सोडशी कशाला, (तू सोडू नको त्याला)
संधी कधि न मिळते, गुरुदेव पाहिले हे।।१।।

संतास पाहिजे ना, मठ, मंदिरे तरीहि।
स्मृती जागवित ठेवी, दीव्यत्व मानवी ही।।
चैतन्य देती सकला, ही आंस मन्मनी हे।।२।।

संताचि मांदीयाळी ज्या ज्या स्थळी विलसते।
त्या त्या स्थळीच तैसे, स्वरुपी ही लीन होते।।
हे पुण्यधाम माझे, अभंग राहिले हे।।३।।

मातीत भारताच्या, असंख्य नाती गोती।
ती सर्व इथे मिळूनी, मंदिर उभवताती।।
चित्तास शांती दिधण्या, रमले मन इथे हे।।४।।

आश्रमात विश्वमंदीर भक्तीधामासमोर यज्ञ वेदी उभारली व त्याच्या पुढील भागात जवळच आई-वडीलांचे भव्य मंदीर उभारले आहे. ज्यामध्ये मधोमध विठ्ठल-रुख्मिणीच्या मुर्तीचे प्राणप्रतिष्ठा केली. समाजाने सुध्दा मनोभावे आई वडीलांची सेवा करावी व कृतार्थ व्हावे, कारण तेच खरे प्रत्यक्ष विठ्ठल आणि रुख्मिणी होय. ''आई बाप हे दैवत माझे, असता माझे घरी कशाला, जावू मी पंढरपुरी'', ही संकल्पना त्यात आहे. तेच माझे माहेर व तिच माझी पंढरी!

## २६) माझे माहेर पंढरी

माझे माहेर पंढरी, आहे सद्‌गुरु दरबारी ।।धृ।।

बाप-माय माझा एकचि शंकरबाबा संत।
बहिण माझी येथे, आहे वशिष्ठा ती शांत ।।
पाप-ताप धुवूनिया, करीतसे दुःख दूरी ।।१।।

हरि दासांच्या भेटी होते, अंगी बळे भक्ती येते।
तप-तीर्थे नेमे व्रते, चरणरज मी वंदिते ।।
भजनी, कीर्तनी डोलते, शंकर बाबा खरोखरी ।।२।।

चंदन-बोरी एक होते, गुण-दोष सर्वहि जाते।
संत चरणी सरिते, अति वेगे ती धावते,
श्री गुरुमनी ना येते, राव, रंकाची ती थोरी ।।३।।

विद्यामंदिर-कॉलेज-वैद्यकिय उपचार, गरीबांसाठी वसतीगृह, तसेच गो शाळा इत्यादींचे निर्माण कार्य अधिकच जोमाने भाविक भक्त करीत आहेत. समाजाने कार्यात खऱ्या अर्थाने मोलाचा वाटा उचलला आहे व ह्या कार्याने कर्मयोगी संत गाडगेबाबांची आठवण करून दिली आहे. गायी-गुरांच्या हंबरण्यातुन संत शंकर बाबांनी भक्तांना काय दाखवून दिले?...!

## २७) गायी गुरांच्या हंबरण्यातुन

गायी गुरांच्या हंबरण्यातूनी, स्वर जणूं सळसळती।
शंकर बाबा हृदय अंतरी, जणू बन्सी नाद होती।।धृ।।

आर्त भाव त्या मुक्या मनाचे।
पिडीत जीवन कधी न कुणाचे।।
दु:ख होई त्या परमेशाते।
गोशाळा मग उभारती ते।।
गोमातेला सुखवी भारती।।१।।

नका विकु कुणी गाय कसाया।
ती तर तुमची माता-बाबा।।
दुखवुनि तिजला काय मिळविता।
पापांचे धनि कां तरी होता?
फळ चांगले कधी ना मिळती।।२।।

भारतवर्षी - परंपरा ही। सर्व देवता गोमाता ही।।
रोग राई ही समूळ जाई। शेण खते आणि मूत्रेहि।।
दुग्धअमृता प्राशुनी जनहि। तृप्त होती.भारती।।३।।

मधाला पाहून जशा मध माशा तुटून पडतात तसाच भाविकांचा मेळा संत दर्शनासाठी, संत समागमासाठी, यज्ञयागासाठी, अध्यात्म ज्ञानासाठी, -सामुहिक विवाहासाठी, समाज प्रबोधनांसाठी, प्रात्यक्षिके करण्यासाठी धावून येतोय. त्यासाठी तर आश्रम खुलाच झाला. ''सबके लिये खुला है'' या राष्ट्रसंत उक्तीप्रमाणेच कार्य सुरु आहे. त्या सर्वांच्या पूर्ततेसाठी भव्य भक्तनिवासाची आणि अत्यंत सुंदर चित्तवेधक, मनोवेधक अशा सद्‌गुरु धामाची निर्मिती झाली. धन्य होय ती कार्यकर्ती मंडळी व भाविक वृंद!

या भक्तनिवासी सद्‌गुरुधामी श्री समर्थ शंकर बाबांच दर्शन घ्या. जीवनातील सुख दुःखाचे गाठोडे सोडा, नि समाधानी व्हा.

गोर गरीबांची शैक्षणिक भूक भागविल्यानंतर, त्यांनी अज्ञानी व अंध जिवांना जवळ केले. सर्व समाजासाठी - भाविक भक्तांसाठी ज्ञानामृत ज्ञानेश्वरी प्रसाद ग्रंथ, सद्‌गुरु महिमामृत, सद्‌गुरु दर्शन आदि ग्रंथ लेखन सद्‌गुरु कृपेने केलेत. समस्त थोर विद्वान मंडळींनी बाबांवर स्तुती सुमने उधळलीत, धन्यता मानली असे अपरोक्ष ज्ञान श्री शंकरबाबांनी सर्वांसाठी खुले केले आहे.

## २८) धन्य धन्य अमुचे शंकर बाबा

अज्ञानी अंध, दुःखी भक्तांस लावी जीवा।
ते एक शंकर बाबा, तो संत ओळखावा ।।धृ ।।

जगी याच देव भरलां, सगळेच सांगताती।
सर्वत्र देव आहे - हे संत सांगताती ।।
स्मृती-शास्त्र हेचि सगळे - तो देव सांगताती।
बघताच आत्मरुपी - तुम्ही एकरूप भावा ।।१ ।।

सुख-दुःख भाव सारे, एकत्र करुनिया।
जो कोणी पाही त्यांते, समभाव होवूनिया ।।
देहत्वी भिन्ननाते, तरी शुध्द एक भावा ।।२ ।।

झालीच एक बिजे, विश्वांत निर्मिती ही।
वाटे अनेक नाती, जरी भिन्न आपणा ही ।।
बीजांत आणि वृक्षी, लक्षी अभेद भावा ।।३ ।।

❖ ❖ ❖



सद्गुरु समर्थ

# २९) श्री लहानुजी महाराज

## आरती

(तर्ज-आरती करो हरिहर की)

आरती करो सन्तन की, लहानुजी गुरुकी प्यारे भगवान की।
आरती करो संतन की।। टेक।।

निकला सूरज पूर्व दिशा में। वैसे आये भांडे कुल में।
करके लीला विचित्र जग में। शीव मूर्ती है प्रभुकी।।१।।

पंचतत्त्व का शाल दुशाला। चांद सूरज का है उजियाला।
सोहंकी चलती है माला। रात-दिन जीवन की।।२।।

विदेह जिनकी मस्त स्थिती है। अंतर्मुख में सदा मगन है।
अजानुबाहु पद्मांकुश है। अलक्ष मुद्रा जिनकी।।३।।

आडकुजी ! है तुम्हें सहारे। दीन दु:खियो को तुने उद्धारे।
शुक्लांबर है वस्त्र तुम्हारा। चिन्मय झाँकी जिनकी।।४।।

इच्छीत फल भक्तोंने पाया। कितनो को भवपार लगाया।
बरखा करदो शान्ती सुखोंकी। होली दरिद्रताकी।।५।।

भक्त काम कल्पदृम स्वामी। सहजासनमे ब्रह्म पछानी।
''दास'' तुम्हारा कुछ ना मांगे। आशा है दर्शनकी।।६।।
आरती करो सन्तन की -



परमहंस श्री सद्गुरु

## ३०) सत्यदेव बाबा महाराज

## आरती

(तर्ज–आरती जगजगदीश्वर की)

आरती सत्यदेव बाबा की। दयाधन ब्रह्मस्वरुपजी की ।। टेक।।

तुम्ही हो सत्यस्वरुप का ग्यान। सदा स्वानंद मस्त है ध्यान।

वृत्ति है निर्विकल्प विज्ञान। तुम्ही हो आत्मज्योति महान।
(तर्ज:) बताकर सार। दिया आधार। किया भव पार।
बहायी सुखा–धार निजकी। दयाधन ब्रह्मस्वरुपजी की।।१।।

सत्यही ईश्वर का है सार। विश्व को सत्यकाही आधार।
तुम्ही हो दया शान्ती भंडार। किया है भक्तो का उद्धार।।
(तर्ज:) मुख में गुरुनाम। रहते गुरुधाम। वृत्ति निष्काम।
वाणी है अमर सत्य जीनकी। दयाधन ब्रह्मस्वरुपजी की।।२।।

सत्य लहानुजी तुकड्यादास। ब्रह्मरुप आडकुजी का ध्यास।
आरती करता हूं यह दास। पंचप्राणो का दीप परकास।।
(तर्ज:) चरण के पास। रहे यह दास। सदा यही आस।
अर्जी है देवकी नंदन की। दयाधन ब्रह्मस्वरुपजी की।।३।।



परमहंस श्री सद्गुरु

# ३१) शंकर बाबा महाराज

## आरती

आरती शंकर बाबा। दिव्य स्वरूपाची प्रभा।
दीपविले नवखंड। प्रकाशली सारी आभा।।धृ।।

पंचप्राण ओवाळीता। नुरले द्वैतभाव चित्ता।
अखण्ड ध्यास तुझा। कोणी न होय परता।।१।।

ध्यानी-ध्याता साक्षी माझा। तूची देही-विदेही।
नादबिंदू जागवोनिया। तुज अंतर्गत पाही।।२।।

चिन्मय रुप तुझे। ध्यानी दर्शन दावीले।
जागविले मज लागी। दावी कृपेची पाऊले।।३।।

अनुभवी गुरु माझा। मज एकांताशी बोले।
अंतरंगी पाही आता। स्वानंदाची पाऊले।।४।।

सोहम् मंत्र जागवीता। अनुभव सिद्ध झाले।
गुरु-शिष्य एक भेटी। जीव-शीव ऐक्य झाले।।५।।

साक्षात्कार तयापुढे। ध्यानी मनी आदी रुपा।
ज्योतिची निज ज्योती। साक्ष साक्षी ब्रम्हरुपा।।६।।

अनुभवी गुरु ऐसा। जगी जागवे स्वरुपा।
'दास' म्हणजे याची छंदे। चुकवी चौऱ्यांशीच्या खेपा।।७।।

आरती शंकर बाबा। दिव्य स्वरूपाची प्रभा।



स्व. श्री. भिमराव शामराव
ऊर्फ श्यामकुमार खंडारे

# परिचय

स्व. श्री. भिमराव शामराव ऊर्फ श्यामकुमार खंडारे यांचे मुळ गाव अमरावती जिल्ह्यातील मंगरुळ दस्तगीर त्यांनी शिक्षकी पेक्षातून आपली सेवा रूजू केली. बालपणापासूनच त्यांना हरिभजनाची ओढ असल्यामुळे त्यांचे रामायण, राष्ट्रसंताचे जीवन दर्शन, गीत गजानन आणि शंकरमहाराज गीतमालेचे कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रात सतत सुरु असतात.

गुरुदेव सेवा मंडळाशी त्यांचा निकटचा संबंध असल्यामुळे त्यांचे आचार-विचार गुरुदेवमय झालेले आहेत. त्यांना संगीताचा व्यासंग असल्यामुळे भजन, कीर्तनातून तबला, हार्मोनियम वर साथ देतांना त्यांच्या संगीताची साक्ष पटते. कवी हृदय असलेले खंडारे गुरुजी आपल्या काव्यातून आणि संगीतातून अबालवृध्दां पर्यंत परिचित आहेत. त्यांची आशीच उत्तरोत्तर प्रगती होवो ! त्यांनी लिहिलेल्या श्री संत शंकर बाबा जीवन दर्शन या पुस्तकाला माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**प्रदीप नेरकर**

(लोकमत वार्ताहर)

मंगरुळ दस्तगीर